PUBLICATION – KESARI
DATE – NOVEMBER 25, 2015
PAGE NO. – 10

# 'पुणे कनेक्ट २०१५' चे २८ नोव्हेंबरला आयोजन




**पुणे :** 'पुणे कनेक्ट' हा 'स्टार्टअपस्' ना व्यासपीठ उपलब्ध करुन देणारा, देशभरात महत्त्वाचा ठरलेला, 'एसईएपी' चा गाजलेला उपक्रम यावर्षी येत्या २८ नोव्हेंबरला हॉटेल वेस्टीन येथे आयोजित करण्यात आला आहे. 'डिजिटल जगात अभिनव कल्पना' (इनोव्हेशन इन द डिजिटल वर्ल्ड), ही या वर्षीची संकल्पना आहे.

डिजिटल जगामध्ये क्रांती घडवून आणणाऱ्या 'स्टार्टअपस्'ना प्रोत्साहन आणि पाठिंबा देणे, तसेच पुण्याला तंत्रज्ञानावर आधारीत नाविन्यपूर्ण उद्योगांचे जागतिक दर्जाचे केंद्र बनविणे हा 'पुणे कनेक्ट २०१५' या उपक्रमाचा उद्देश आहे.

सकाळी साडेनऊ वाजता या कार्यक्रमासाठी नोंदणी सुरु होईल. 'एसईएपी'चे अध्यक्ष एस.रामप्रसाद यांच्या स्वागतपर भाषणानंतर 'सिस्को'चे अभियांत्रिकी आणि भारत विभागाचे अध्यक्ष अमित फडणीस यांचे बीजभाषण होईल.

यानंतर विविध विषयांवर गटचर्चा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये 'केपीआयटी टेक्नॉलॉजीजच्या प्रॉडक्ट आणि प्लॅटफॉर्म एसबीयु विभागाचे ग्लोबल हेड अनुप साबळे,' 'ध्रुव'चे अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष अभय घैसास, ' ॲप्लाइड मायक्रो सर्किटाड्स प्रा. लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप धारणे असे मान्यवर सहभागी होणार आहेत.